कार्यवाही करून नवीन समिती अस्तित्वात येण्याची अंमलबजावणी करील व तसे करण्यात संस्थेने कसूर केला आहे आणि;

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ३(सहा) तरतुदीनुसार संस्थाच्या किंवा संस्था वर्गाच्या निवडणुकांसाठी कलम ७३ कब पोटकलम (१३) अन्वये जरूर असणारी अंदाजित खर्चाची रक्कम म्हणुन आगाऊ स्वरुपात निवडणुक निधी मध्ये जमा करण्याची तरतुद आहे तसेच मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,धुळे यांनी लेखी पत्राव्दारे लेखी सुचित करूनही संस्थेने निवडणुक निधीचा भरणा केलेला नाही आाणि;

ज्याअर्थी संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (१-अ) (ब) मध्ये तरतुद आहे की संस्थेचे व्यवस्थापन समितीने संस्थेच्या समितीची कालावधी पुर्ण होण्यापुर्वी निवडणुकीची कार्यवाही करून नवीन समिती अस्तित्वात येण्याची अंमलबजावणी करील व तसे करण्यात संस्थेने कसूर केला आहे असे या कार्यालयाचे मत आहे.

त्याअर्थी मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

मी, प्रदीप बागुल, सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,शिंदखेडा, मला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ नुसार प्राप्त झालेल्या विधीशक्तीनुसार सदर संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ३(सहा) तरतुदीनुसार निवडणुकांसाठी कलम ७३ कब पोटकलम (१३) अन्वये जरूर असणारी अंदाजित खर्चाची रक्कम म्हणुन आगाऊ स्वरुपात निवडणुक निधी मध्ये जमा करण्यात कसूर केली असल्यामुळे विरदेल नं.२ विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.विरदेल नं.२ ता.शिंदखेडा जि.धुळे या संस्थेवर श्री एम. एस. वेलाडे. बँक तपासणीस. शाखा विरदेल जि.म.स.बँक धुळे यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नेमणुक करण्यात येत आहे.

सदरचा आदेश आज रोजी दिनांक २१ /५/२०१७ रोजी माझ्या सही शिक्यानिशी पारीत करीत आहे.

(प्रदीप बागुल)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,शिंदखेडा जि.धुळे

प्रत:-

१.श्री एम. एस. वेलाडे. बँक तपासणीस. शाखा विरदेल. जि.म.स.बँक धुळे

२/- यांना सुचित करण्यात येते की, त्यांनी संस्थेचा पदभार घेवून तसा अहवाल सादर करावा तसचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणुक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार कामकाज करून वेळोवेळी अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२. चेअरमन/सचिव, विरदेल नं.२ विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.विरदेल नं.२ ता.शिंदखेडा जि.धुळे

२/- यांना सुचित करण्यात येते की, आपण उक्त आदेशाची अंमलबजावणी करावी.

३. मु.का.अ. धुळे जि.म.स.बँक मर्या. धुळे

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,शिंदखेडा जि.धुळे

सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,शिंदखेडा जि.धुळे
शिंदखेडा तालुका देखरेख संघ लि.शिंदखेडा यांचे कार्यालयाचे इमारतीत,स्टेशन रोड,शिंदखेडा जि.धुळे

---

जा.क्र.वि-२/विरदेल नं२ /कलम७७ अ/सन२०१७ दिनांक २१ /०५/२०१७

वाचावेः-१.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० (सुधारणा २०१३) चे कलम ७७-अ (१-अ) (ब)
२.महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणुक) नियम २०१४ मधील तरतुदी
३.मा.राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचेकडील आदेश जा.क्र.५५०/ रासनिप्रा/तालुकाप्रभाग/आदेश/सन२०१४,दिनांक १०/१०/२०१४
४.मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,धुळे कार्यालयाकडील पत्र जा.क्र.वि-७/निवडणुक/ब वर्ग संस्था/नि.निधी/सन २०१५, दिनांक / /२०१५
५.मा.जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,धुळे यांचे कार्यालयाकडील पत्र जा.क्र.वि-७/निवडणुक/बवर्ग संस्था/निधी-भरणा/कार्यवाही/सन २०१६ दिनांक २१/४/२०१६

---

ज्याअर्थी विरदेल नं.२ विविध कार्यकारी सहकारी संस्था मर्या.विरदेल नं.२ ता.शिंदखेडा जि.धुळे ही संस्था या कार्यालयाने नोंदणी केलेली नोंदणीकृत सहकारी संस्था असून सदर सस्थंचे निबंधक, हे कार्यालय आहे.यापुढे संस्था असा नामोल्लेखीत.

ज्याअर्थी वाचावे क्र.२ मधील भाग क्र.२ चा ४ (III) मध्ये सदर संस्था निवडणुकीच्या ब वर्गात समाविष्ट होते.आणि, ब वर्गातील सहकारी संस्थांचे निवडणुकीची प्रक्रीया राबविण्याचे अधिकार संदर्भ क्र.२ नुसार मा.जिल्हा सहकार निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,धुळे यांना आहेत आणि,

ज्याअर्थी संस्थेने सादर केलेल्या नमुना ई-२ नुसार दिनांक १२/११/२०१५ मध्ये निवडणुकीस पात्र असल्याचे दिसून येते.

ज्याअर्थी महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीचे निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ३(सहा) तरतुदीनुसार संस्थांच्या किंवा संस्था वर्गाच्या निवडणुकांसाठी कलम ७३ कब पोटकलम (१३) अन्वये जरूर असणारी अंदाजित खर्चाची रक्कम म्हणुन आगाऊ स्वरुपात निवडणुक निधी मध्ये जमा करण्याची तरतुद आहे. अन्यथा सदरची रक्कम जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुल करण्याचे अधिकार तालुका सहकारी निवडणुक अधिकारीस प्रदान करण्यात आलेले आहे.

ज्याअर्थी संस्थेने या कार्यालयास मतदार यादी सादर केल्यानंतर सदरची संस्था निवडणुकीच्या ब वर्गातील असल्यामुळे मतदार यादी निवडणुकीच्या पुढील कार्यवाहीसाठी मा.जिल्हा सहकार निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,धुळे कार्यालयास सादर करण्यात आली आहे.आणि;

ज्याअर्थी सदर्भ क्र.४ नुसार मा.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, धुळे कार्यालयाने संस्थेस निवडणुक निधीचा भरणा जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी यांचे भारतीय स्टेट बॅक, कोषागार शाखा येथे राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे नावाने असलेले खाते क्र.३४४१४०४८५७७ मध्ये रेखांकित धनादेश/डिमांड ड्राफ्ट किंवा रोखीने भरणा करावा असे लेखी पत्राव्दारे सुचित केले आहे.आणि;

ज्याअर्थी संस्थेने निवडणुक निधीची भरणा केला नसल्यामुळे अथवा अपुर्ण निधी भरणा केलेला आहे त्यामुळे संस्थेची निवडणुक प्रक्रीया सुरु करता आली नाही आणि;

ज्याअर्थी उक्त संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ (१-अ) (ब) मध्ये तरतुद आहे की संस्थेचे व्यवस्थापन समितीने संस्थेच्या समितीची कालावधी पुर्ण होण्यापुर्वी निवडणुकीची